सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ८३ | रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. नीलेश साळुंखे (बाबू)
सामाजिक कार्यकर्ता, अमळनेर.

## दिनविशेष
१४ डिसेंबर

- राइट बंधूंनी किट्टीहॉक, नॉर्थ कॅरोलिना येथे उड्डाणाचा पहिला प्रयत्न केला.
- दुसरे महायुद्ध जपानने थायलंडसोबत सहकार्य करार केला.
- बी. के. एस. अय्यंगार योगाचार्य यांचा जन्म.
- राज कपूर अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक यांचा जन्म.
- प्रसाद सावकार गायक व नट यांचा जन्म.
- संजय गांधी राजकारणी व इंदिरा गांधी यांचे पुत्र यांचा जन्म.
- विजय अमृतराज भारतीय लॉनटेनिसपटू यांचा जन्म.
- शंकरदास केसरीलाल गीतकार यांचे निधन.
- सी एन करुणाकरन भारतीय चित्रकार यांचे निधन.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या उपोषणाची सांगता

## मुख्यमंत्री फडणवीसांची मध्यस्थी; मंत्री ना. लोढा यांनी उपोषणस्थळी भेट देऊन सोडविले आंदोलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पत्रकार व पत्रकारितेशी संबंधित ३३ मागण्यांसाठी 'व्हॉईस ऑफ मीडिया' आणि 'व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम'च्या वतीने यशवंत स्टेडियम येथे उपोषण सुरू होते. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्थी व आश्वासनानंतर शनिवार, दि. १३ डिसेंबर रोजी हे उपोषण मागे घेण्यात आले. मंत्री ना. प्रसाद लोढा यांनी प्रत्यक्ष उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणाची सांगता केली.

अधिवेशन सुरू झाल्यापासून 'व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम'च्या वतीने हे उपोषण सुरू होते. १५ व १६ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शिखर अधिवेशनात वर्तमानपत्र, टीव्ही, रेडिओ आणि डिजिटल



*नागपूर : विविध मागण्यांबाबत शनिवार, दि. १३ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करताना व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, विश्वस्त व महाराष्ट्र समन्वयक किशोर कारंजेकर, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अनिल मस्के, नागपूर जिल्हाध्यक्ष दिलीप घोरमारे, राज्य कोअर कमिटीचे प्रमुख कल्पेश महाले आदी.*

मीडियासंदर्भातील ३३ मागण्यांचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले होते. या ठरावांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी संपूर्ण पदाधिकारी साखळी उपोषणाला बसले होते. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या चार दिवसात उपोषणस्थळी अनेक मान्यवरांनी भेट दिली होती. यामध्ये १० आमदार, ३ खासदार आणि ४ माजी मंत्र्यांचा समावेश होता. संघटनेने पत्रकार व पत्रकारितेसाठी केलेले कार्य सरकारपर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन प्रत्येक भेट देणाऱ्या मान्यवरांनी दिले.

दरम्यान, माजी मंत्री तथा कॅबिनेट मंत्री ना. प्रसाद लोढा हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दूत म्हणून उपोषणस्थळी आले. " मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला हे उपोषण सोडवण्यासाठी पाठवले आहे. आपल्या मागण्या मान्य केल्या जातील," असे आश्वासन त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने दिले. 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने चौथा स्तंभ मजबूत करण्यासाठी केलेले कार्य नोंद घेण्यासारखे आहे. संघटनेने असेच काम पुढे सुरू ठेवावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. यानंतर मंत्री लोढा यांच्या हस्ते 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, विश्वस्त व महाराष्ट्र समन्वयक किशोर कारंजेकर, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अनिल मस्के, नागपूर जिल्हाध्यक्ष दिलीप घोरमारे आणि राज्य कोअर कमिटीचे प्रमुख कल्पेश महाले यांना ज्यूस देऊन उपोषणाची अधिकृत सांगता करण्यात आली. उपोषणाच्या सांगतेवेळी 'व्हॉईस ऑफ मीडिया जिंदाबाद'च्या घोषणांनी यशवंत स्टेडियम परिसर दणाणून गेला. आंदोलनात सहभागी सर्व पदाधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि उत्साह दिसत होता. पत्रकारांनी पत्रकारितेसाठी उभा केलेला हा लढा महाराष्ट्रात सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### 'जीआर' निघेपर्यंत लढा सुरूच राहणार : संदीप काळे

यावेळी संदीप काळे म्हणाले, की संपूर्ण प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी सर्व मागण्या मान्य असल्याचे स्पष्ट केले आहे. यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन सविस्तर भूमिका मांडली जाईल. मात्र, जोपर्यंत मागण्यांचा शासन निर्णय निघत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेस मंजुरी

## महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : ग्रामीण भागातील शेत आणि पाणंद रस्त्यांची गरज वाढली आहे. तसेच मनरेगा अंतर्गत कामांमध्ये येणाऱ्या अडचणींमुळे शेतकऱ्यांना समस्या भेडसावत आहेत. यावर उपाय म्हणून राज्यात शासनाने शेतरस्ते योजना राबविण्याचे ठरविले आहे. त्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना राबविण्यास शनिवार, दि. १३ डिसेंबर रोजी मंजुरी दिली आहे. याबाबतची माहिती महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषद आणि विधानसभेत दिली आहे.

महसूल मंत्री ना. बावनकुळे म्हणाले, की शेतीमधील वाढते



यांत्रिकीकरण लक्षात घेऊन ही योजना महसूल विभागामार्फत पूर्णतः यंत्रसामग्रीच्या सहाय्याने राबविण्यात येणार आहे. रोजगार हमी योजना विभागाची 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत, पाणंद रस्ते योजना' पूर्ववत सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### योजनेची वैशिष्ट्ये

बारमाही, मजबूत रस्त्यांचे बांधकाम करून पेरणी, मशागत, कापणी आणि शेतमाल वाहतुकीस गती देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. यानुसार गाव नकाशांवर दर्शविलेल्या रस्त्यांवरील अतिक्रमणे त्वरित हटविण्यात येणार आहे. रस्ते बांधणीस लागणाऱ्या गाळ, माती, मुरुम व दगडासाठी कोणतेही रॉयल्टी शुल्क आकारले जाणार नाही. रस्त्यासाठी आवश्यक तातडीची मोजणी शुल्क व पोलीस बंदोबस्त शुल्क पूर्णपणे माफ असणार आहे. योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडून अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल. सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर) मधूनही निधी घेण्याची सुविधा; याकरिता उपविभागीय अधिकाऱ्यांच्या नावे स्वतंत्र खाते उघडण्यात येणार आहे.

### कशी होणार अंमलबजावणी?

प्रभावी अंमलबजावणीसाठी बहुस्तरीय समित्या राज्यस्तरावर महसूलमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हास्तरावर पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आणि विधानसभा क्षेत्रस्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना शेतात ये-जा सुलभ होणार आहे. बाजारपेठेशी संपर्क अधिक मजबूत होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीव्यवस्थेला मोठा आधार मिळेल, असा विश्वास मंत्री ना. बावनकुळे यांनी व्यक्त केला.

**खा. शि. मंडळाची निवडणूक**

# पहिल्याच दिवशी १८ उमेदवारी अर्ज दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळाच्या निवडणुकीसाठी शनिवार, दि. १३ डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पहिल्याच दिवशी १८ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

अध्यक्ष पदासाठी विनोद जगदीश अग्रवाल, उपाध्यक्ष पदासाठी सचिन बुधा पाटील, कमल आसकरण कोचर, श्रीमती माधुरी प्रमोद पाटील व नगिनचंद ज्ञानचंद लोढा, विश्वस्त पदासाठी सौ. वसुंधरा दशरथ लांडगे, नगिनचंद ग्यानचंद लोढा, कार्यकारी मंडळ सदस्य पदासाठी निशांत राजेंद्र अग्राल, योगेश मधुसुदन मुंदडे, पंकज गोविंद मुंदडे, कल्याण साहेबराव पाटील, कमल आसकरण कोचर, हरी भिका वाणी, जितेंद्र मोहनलाल जैन, डॉ. अनिल नथ्थू शिंदे, प्रदीप कुंदनलाल अग्रवाल, निरज दीपचंद अग्रवाल, डॉ. संदेश बिपिन गुजराथी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यासाठी निवडणूक उपसमितीचे चेअरमन पंडित चौधरी, सदस्य विवेकानंद भांडारकर, मनोहर महाजन, प्रा. डॉ. सुनील गरुड, प्रा. पराग पाटील यांनी कामकाज पाहिले. दरम्यान, १३ डिसेंबरपर्यंत एकूण ४८ उमेदवारी अर्जांची विक्री झाली आहे.

# प्रताप महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची 'आविष्कार' स्पर्धेसाठी निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाला चालना मिळावी, त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने विद्यापीठातर्फे सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी धरणगाव येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जिल्हास्तरीय ' आविष्कार ' पोस्टर स्पर्धा झाली होती. या स्पर्धेत येथील प्रताप महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील १० विद्यार्थी (५ पोस्टर्स) सहभागी झाले होते. त्यापैकी ४ विद्यार्थ्यांची कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात ३० व ३१ डिसेंबर रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नेतल माधवानी, रोशनी सोनार, आदित्य पाठक व अनिकेत राठोड या विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख प्रा. शशिकांत जोशी, प्रा. हेमलता सूर्यवंशी- भोसले, प्रा. वैशाली महाजन व प्रा. नेहा महाजन यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

प्रताप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, खानदेश शिक्षण मंडळाचे चिटणीस प्रा. पी. पी.पाटील, परीक्षा नियंत्रक प्रा. शशिकांत जोशी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. अविष्कार समिती प्रमुख डॉ. रवी बाळसकर, संघ व्यवस्थापक प्रा. रामदास सुरळकर, प्रा. विवेक बडगुजर, डॉ. विजय तुंटे, डॉ. रमेश माने, प्रा. डॉ. कांबळे, डॉ. बालाजी कांबळे, प्रा. हर्षल सराफ, खा. शि. मंडळाचे पदाधिकारी, डॉ. धिरज वैष्णव, डॉ. अमित पाटील, ग्रंथपाल दीपक पाटील, डॉ. जितेंद्र पाटील, प्रा. विजय साळुंखे, अंतर्गत गुणवत्ता अभिवचन कक्षाचे डॉ. मुकेश भोळे आदींनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



**क्रिकेटविश्व हादरले!**

# मॅच फिक्सिंगच्या जाळ्यात भारताचे ४ खेळाडू

## मोठी कारवाई, नेमके काय घडले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय क्रिकेटवर पुन्हा एकदा मॅच फिक्सिंगचे सावट पसरलेले पाहावयास मिळत आहे. देशातील प्रमुख देशांतर्गत स्पर्धा 'सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५' दरम्यान मॅच फिक्सिंग करण्याच्या प्रयत्नांप्रकरणी असम क्रिकेट संघटनेने आपल्या चार खेळाडूंना तत्काळ निलंबित केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार या चार खेळाडूंवर असमच्या सध्याच्या संघातील सदस्यांना भ्रष्ट कृत्यांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केल्याचा गंभीर आरोप आहे. हे कथित प्रकरण २६ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर २०२५ या कालावधीत सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या सामन्यादरम्यान घडल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेत असम संघ ग्रुप स्टेजमधूनच बाहेर पडला होता. उल्लेखनीय बाब म्हणजे ' बीसीसीआय 'चे सचिव देवजित सैकिया हेही असम क्रिकेटशी संबंधित आहेत.

या ४ खेळाडूंवर कारवाई असम क्रिकेट संघटनेने शुक्रवार, १२ डिसेंबर रोजी एक अधिकृत पत्रक जारी करत हा धक्कादायक खुलासा केला. त्यानुसार अमित सिन्हा, इशान अहमद ,अमन त्रिपाठी आणि अभिषेक ठाकुरी या चारही खेळाडूंना निलंबित करण्यात आले आहे. हे सर्व खेळाडू वेगवेगळ्या स्तरांवर असमसाठी क्रिकेट खेळलेले आहेत.

असम क्रिकेट संघटनेने केली एफआयआर दाखल या प्रकरणी असम क्रिकेट संघटनेने क्राइम ब्रँचकडे एफआयआर दाखल केली आहे. संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे, की ' तक्रारी समोर आल्यानंतर बीसीसीआयच्या अँटी करप्शन अँड सिक्युरिटी युनिटने तपास सुरू केला. असम क्रिकेट संघटनेनेही स्वतंत्र फौजदारी चौकशी हाती घेतली. प्राथमिक तपासात या खेळाडूंचा गंभीर आरोपांमध्ये सहभाग आढळून आला. यामुळे खेळाच्या पवित्रतेला तडा गेला आहे. परिस्थिती अधिक बिघडू नये म्हणून त्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला.' असम क्रिकेट संघटनेने या चौघांवर संपूर्ण राज्यात कोणत्याही प्रकारच्या क्रिकेट उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास बंदी घातली आहे. चौकशी पूर्ण होऊन निर्दोषत्व सिद्ध होईपर्यंत हे खेळाडू कोणत्याही स्तरावरील स्पर्धेत खेळू शकणार नाहीत. याबाबत राज्यातील



सर्व जिल्हा क्रिकेट संघटनांना कळवण्यात आले आहे. मात्र, अद्याप हे स्पष्ट झालेले नाही की हे खेळाडू कोणत्याही सामन्यावर किंवा खेळाडूवर प्रत्यक्ष परिणाम घडवण्यात यशस्वी झाले होते की नाही.

रणजी ट्रॉफी खेळणारा खेळाडूही संशयाच्या भोवऱ्यात या प्रकरणातील सर्वांत धक्कादायक नाव म्हणजे अभिषेक ठाकुरी. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी सुरू होण्याच्या काही दिवस आधीच तो रणजी ट्रॉफीत असमकडून खेळत होता. त्याने सर्व्हिसेस आणि त्रिपुरा विरुद्धच्या सामन्यांमध्ये भाग घेतला होता. या मालिकेत त्याच्या तीन डावांमध्ये अनुक्रमे ९, २० आणि २० धावा झाल्या होत्या. मात्र, या रणजी सामन्यांतील त्याची कामगिरीही तपासाच्या कक्षेत आहे की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मागील हंगामातही ठाकुरीने विजय हजारे ट्रॉफी आणि रणजी ट्रॉफीमध्ये सहभाग घेतला होता. तर अमित सिन्हा २०२१ मध्ये सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीत सामने खेळला होता.



# महान उद्योगपती : भारतरत्न जेआरडी टाटा




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतरत्न जेआरडी टाटा यांची पुण्यतिथी २९ नोव्हेंबर रोजी सर्वत्र साजरी झाली. त्यांच्या स्मृतीस सादर प्रणाम! आभाळाएवढ्या मोठ्या मनाच्या जेआरडींच्या साधेपणाचे किस्से वाचायलाच हवेत. कोणताही ' मोठा माणूस ' हा त्याला भेटणाऱ्या माणसावर एक दडपण आणत असतो. त्याने केलेले काम, त्याच्याकडचा पैसा, मान, मरातब या गोष्टी नाही म्हटल्या तरी इतरांसमोर आभाळाइतके मोठे रूप तयार करतात. आपल्या मोठेपणाचा भपका इतरांवर पडू न देणे आणि आपल्यातला साधेपणा टिकवून ठेवणे फार कमी लोकांना जमते. अशाच मोजक्या लोकांमधील महत्त्वाचे नाव म्हणजे ' भारतरत्न जे. आर. डी. टाटा, ' जे. आर. डी. टाटा यांच्या संपर्कात येणारा प्रत्येक माणूस त्यांच्या मोठेपणामुळे आणि साधेपणामुळे भारावून जायचा.

गौतम राजाध्यक्ष हे नावाजलेले फोटोग्राफर होते. त्यांनी अनेक दिग्गजांना कॅमेऱ्यात टिपले. १९८८ मध्ये त्यांच्यावर जे.आर.डी. यांची फोटोग्राफी करण्याची जबाबदारी आली होती. त्याचे झाले असे, की जे.आर.डी. यांचे पुस्तक ' की नोट ' प्रकाशित होणार होते. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर छापण्यात येणारा फोटो अजून ठरत नव्हता. एका मोठ्या फोटोग्राफरने त्यांचे फोटो काढलेही होते. मात्र जे.आर.डीं.ना ते आवडले नाहीत. कारण फारच गमतीशीर होते. जे.आर.डीं.ना त्यांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या सुरकुत्या नको होत्या. त्यांच्या मते त्यांच्या सुरकुत्याच तेवढ्या फोटोग्राफरने फोटोत पकडल्या होत्या. हे ऐकून गौतम राजाध्यक्ष यांना टेन्शन आले. चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवायच्या कशा याचा ते विचार करू लागले. त्यांनी मित्राला फोन करून एक लेन्स मागवून घेतली. आदल्या दिवशी जे.आर.डीं.च्या घरी जाऊन कपडे आणि फोटोची जागा ठरवली. दुसऱ्या दिवशी सकाळी बरोबर ठरलेल्या वेळेत ते आले. नावाजलेल्या व्यक्तीला भेटताना जे दडपण येते तेच दडपण गौतम राजाध्यक्ष यांना आले होते. दोघे पूर्वी कधीच भेटले नव्हते. ते कसे आहेत याबद्दलही जुजबी माहिती होती. मात्र ही पहिली भेट अगदी सहज पार पडली. बरोबर साडेनऊ वाजता जे.आर.डी. आदल्या दिवशी राजाध्यक्षांनी निवडलेला सूट घालून आले. जुनी ओळख असल्यासारखे त्यांनी विचारले, की ' हा ठीक आहे ना? टाय मॅच होतोय का मला?' या पहिल्याच वाक्याने बोलण्यात आलेली सहजता पुढे संपूर्ण फोटोसेशनमध्ये टिकून राहिली. जे.आर.डी. आणि गौतम राजाध्यक्ष पूर्वी कधीही भेटलेले नव्हते. तरीही जे.आर.डीं.नी त्यांच्याशी टाटा, एअर इंडिया ते फोटोग्राफी अशा वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारल्या. फोटोसेशनवेळी तेथे जे.आर.डीं.चे नातेवाईकही उपस्थिती होते. सगळे एकाच वयाचे असल्यासारखे तेथे वातावरण होते.

आज आपण गुगलवर जे.आर.डी. टाटा सर्च केल्यावर जे फोटो दिसतात त्यातील बहुतेक हे यावेळचेच फोटो आहेत. या फोटोसेशनला एक तासांचा अवधी लागला. राजाध्यक्ष यांच्या कॅमेऱ्याने अशी काही जादू केली होती, की जे.आर.डीं.च्या सुरकुत्या तर निघून गेल्याच पण फोटोमध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व साफ झळकत होते. भविष्याकडे पाहणारी नजर, त्यांच्या अनुभवातील श्रीमंती आणि सहजता फोटोमध्ये अचूक आली होती. काही दिवसांनी जेव्हा राजाध्यक्ष यांनी भीतभीत फोटोबद्दल चौकशी केली तेव्हा त्यांना सुखद धक्का बसला. जे.आर.डीं.ना फोटो आवडले होते. एवढेच नव्हे तर फोटो प्रिंटींगला पाठविण्यात देखील आले होते. दहा दिवसांनी राजाध्याक्षांना पुस्तकाची आगाऊ कॉपी मिळाली. मुखपृष्ठावर त्यांनी काढलेला फोटो छापण्यात आला होता. ' की नोट्स ' पुस्तकाचे हे कव्हर पाहा.

हा किस्सा येथेच संपत नाही. वर्षभराने राजाध्यक्ष जे.आर.डीं.ना दिल्लीत भेटले. राजाध्याक्षांना वाटले, की जे.आर.डी. आपल्याला विसरले असतील. त्यामुळे त्यांनी आपली ओळख करून दिली तर जे.आर.डीं.नी त्यांना मध्येच थांबवून म्हटले, की ' मला माहिती आहे, माझे ते सुरेख फोटो तूच काढले होतेस. मी मिसेस दिवेचांना सांगितले, की यापुढे कधीही कोणत्याही पत्रकाबरोबर त्यातीलच फोटो वापरायचे. थॅंक यू, खूप छान फोटो काढलेस माझे.'

जे.आर.डी.सारख्या उद्योगपतीच्या आयुष्यात वर्षभरात अनेक गोष्टी घडत असतात. तरी त्यांनी वर्षभरापुर्वीची त्यांची भेट लक्षात ठेवली. एवढेच नाही तर कामाचे तोंडभरून कौतुक केले.

राजाध्यक्षांनी जे.आर.डीं.ना शेवटचे पाहिले त्यावेळचा प्रसंगही वाचण्यासारखा आहे. सकाळी साडेअकराची वेळ होती. बॉम्बे हाऊसमध्ये प्रचंड गर्दी होती. सगळ्या लिफ्टसमोर लोकांनी रांगा लावल्या होत्या. थोड्या वेळाने जे.आर.डी. तेथे आले. ते अत्यंत कृश दिसत होते. लोकांनी लगेच बाजूला होऊन त्यांना पुढे जाऊ दिले. त्यावेळी ते लोकांना काहीशा तिखट, पण स्पष्ट आवाजात म्हणाले, की ' ठीक आहे, ठीक आहे, लिफ्टमध्ये शिरा. मी उशिरा आलो. माझ्यापाशी भरपूर वेळ आहे. निवृत्त झालेला मी एक म्हातारा माणूस आहे. माझी खात्री आहे की तुम्हा सगळ्या तरुणांना खूप कमी वेळ आणि खूप जास्त काम आहे. तेव्हा तुम्ही आधी जा बरे. '

आपण किती मोठे आहोत हे जे.आर.डीं.नी कधी समजले नाही आणि कोणापुढे ते मिरवलेही नाही. एअर इंडियाने प्रवास करताना विमानातले सगळे कर्मचारी त्यांच्या मागे-मागे असायचे. तेव्हा त्यांनी अनेकदा कर्मचाऱ्यांना ठणकावून सांगितले होते, की ' मी एअर इंडियाचा चेअरमन आहे. त्यामुळे मी फुकट प्रवास करतो. तेव्हा माझी खातिरदारी करण्याऐवजी जे पैसे देऊन प्रवास करतात त्यांची काळजी घ्या.'

जे.आर.डीं.ना जेव्हा भारतरत्न मिळाला तेव्हाही त्यांनी म्हटले होत, की ' मी भारावून गेलो. मी तेवढा मोठा नाही. ' खरेतर भारतरत्न पुरस्कारासाठी जे.आर.डीं.पेक्षा चांगली निवड कोणती असणार होती? राजाध्यक्ष म्हणतात त्याप्रमाणे ' टाटांनी मोठे होण्यापेक्षा भारताने मोठे होण्यात त्यांना रस होता. '



## सक्सेस स्टोरी

# टैक्स ऑफिसर की ड्यूटी के दौरान आया यूपीएससी रिजल्ट, आस्था सिंह २१ की उम्र में बन गईं आयएएस



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यूपीएससी सिविल सर्विस २०२४ का फाइनल रिजल्ट जारी होते ही हर तरफ आस्था सिंह की चर्चा होने लगी। आस्था सिंह ने महज २१ साल की उम्र में देश की सबसे कठिन परीक्षा को क्रैक कर लिया। खास बात ये है कि आस्था ने बिना किसी कोचिंग की मदद के ही इस परीक्षा को पहले प्रयास में ही रैंक ६१ लाकर इतिहास रच दिया है। आइए उनकी स्ट्रैटजी और सफलता के पीछे के संघर्ष को जानते हैं।

### आस्था सिंह का शानदार सफर

आस्था सिंह मूलरूप से पंजाब की रहने वाली हैं. हालांकि, उनकी स्कूली पढ़ाई भोपाल और पंचकुला में हुई। उन्होंने साल २०२३ में श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्स, दिल्ली यूनिवर्सिटी से बी.ए. अर्थशास्त्र में ग्रेजुएशन पूरा किया. आस्था बताती हैं कि वे बचपन से पढ़ाई में काफी अच्छी थीं, हमेशा टॉपर रहीं, लेकिन करियर को लेकर कई बार कंफ्यूजन हुआ. कभी वैज्ञानिक, तो कभी साइकिएट्रिस्ट बनने का मन किया। उनके दादाजी अक्सर कहते थे, ये कलेक्टर बनेगी। १२ वीं बोर्ड के बाद उन्होंने तय किया कि उन्हें यूपीएससी की तैयारी करनी है। उन्होंने इकोनॉमिक्स ऑनर्स इसलिए चुना ताकि बाद में वही विषय अपने ऑप्शनल के तौर पर ले सकें।

### यूपीएससी इंटरव्यूव्ह वाले दिन आस्था परिवार के साथ दिल्ली छोड़ी

कॉलेज खत्म करने के बाद आस्था दिल्ली की बजाय जिरकपुर वापस आ गईं। उनका कहना है कि दिल्ली में रहकर तैयारी करना थोड़ा मुश्किल लग रहा था, इसलिए उन्होंने खुद ही सेल्फ-स्टडी का रास्ता चुना। उन्होंने किसी फाउंडेशन कोर्स में एडमिशन नहीं लिया क्योंकि उनके पास तैयारी के लिए एक साल से भी कम समय था।

### एचपीएससी एचसीएस में रैंक ३१

यूपीएससी क्लियर करने से पहले ही आस्था ने हरियाणा पब्लिक सर्विस कमीशन की एचसीएस परीक्षा भी पास की थी, जिसमें उन्हें एआयआप ३१ मिली. वे हरियाणा सरकार में असिस्टंट एक्साइज ॲण्ड टॅक्सेशन ऑफिसर के रूप में ट्रेनिंग कर रही हैं। आस्था बताती हैं कि अगस्त २०२४ में जब एचसीएस की ट्रेनिंग शुरू हुई, तब भी उन्होंने हर दिन ६-७ घंटे यूपीएससी की पढ़ाई जारी रखी। इसी समय उन्हें समझ आया कि इस परीक्षा में सिर्फ मेहनत नहीं, बल्कि स्मार्ट वर्क की भी बहुत जरूरत होती है। टैक्स ऑफिसर की ड्यूटी के दौरान ही उनका यूपीएससी रिजल्ट आ गया। आस्था सिंह ने पहली ही कोशिश में यूपीएससी परीक्षा रैंक २१ से क्रैक कर ली।

# लग्न मोडल्यावर स्मृती मानधनाचे उघडपणे अनेक खुलासे

## पहिल्यांदाच सगळे सांगितले; म्हणाली मी दिवस- रात्र...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्मृती मानधना हिचे लग्न गायक आणि संगीतकार पलाश मुच्छलशी २३ नोव्हेंबर रोजी होणार होते. मात्र, आता त्यांचे लग्न मोडल्याचे समोर आले आहे. स्मृतीने स्वतः याबाबत माहिती दिली. त्यानंतर स्मृती पहिल्यांदाच एका कार्यक्रमात पोहोचली आणि उघडपणे सर्व गोष्टींवर बोलू लागली आहे.

या कार्यक्रमात तिने अनेक गोष्टींवर बिनधास्तपणे मत मांडले. तिने खासगी आयुष्यावरही भाष्य केले आहे.

लग्न मोडल्यानंतर स्मृती पहिल्यांदाच सार्वजनिक व्यासपीठावर दिसली. दिल्लीत एका कार्यक्रमात ती कर्णधार हरमनप्रीत कौरसोबत उपस्थित होती. त्यावेळी स्मृतीने सांगितले की, क्रिकेटपेक्षा जास्त महत्त्व ती आपल्या आयुष्यात दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला देत नाहीत. फक्त चेंडू पाहायचा आणि मारायचा. स्मृती मानधनाने या कार्यक्रमात मन मोकळे करून बोलताना स्वतःच्या मानसिकतेवरही भाष्य केले.

मानसिकदृष्ट्या स्वतःला कसे मजबूत ठेवतात, यावर स्मृती म्हणाली, की मी नेहमी खूप साधी व्यक्ती राहिली आहे, कोणत्याही गोष्टीचा जास्त विचार करून आयुष्य अवघड करून घेत नाही. मला ज्यावर पूर्ण विश्वास आहे तो म्हणजे, जर तुम्ही पडद्यामागे खूप मेहनत घेतली. मैदानावर जे काही घडते ते सगळेच पाहतात आणि न्याय देतात. पण मी स्वतःला किंवा संघाला पडद्यामागे केलेल्या त्या कामावरूनच न्याय देते. त्या कामाला दिवसरात्र झोकून देण्याचा मला खूप अभिमान आहे. मला चांगले वाटत असो किंवा वाईट, काहीही असो, मात्र जर तुम्ही ती मेहनत घेतली तर पुढे काय होणार याचा खूप आत्मविश्वास येतो. मला क्रिकेटपेक्षा जास्त काहीही आवडत नाही. भारतीय जर्सी घालणे हाच माझा सगळ्यात मोठा प्रेरणास्रोत आहे. लहानपणापासूनच माझे स्वप्न होते, की लोक मला 'वर्ल्ड चॅम्पियन' म्हणतील.

# डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा प्रेरणादायी प्रवास...

मुलांनो,

आज आपण भारताला गरुडझेप घ्यायला शिकविणारे, जगप्रसिद्ध मिसाईल मॅन आणि भारताचे ११ वे राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या बालपणातील प्रेरणादायी प्रवासावर दृष्टिक्षेप टाकणार आहोत. त्यांचे पूर्ण नाव अवूल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम असे होते. त्यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तमिळनाडूतील रामेश्वरम् येथे एका गरीब कुटुंबात झाला. परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यांचे वडील नावाडी होते, तर आई घर सांभाळत असे.

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर संपूर्ण देशात आशेची एक लाट उसळली होती. छोट्या अब्दुललाही देशासाठी काहीतरी मोठे करण्याची तीव्र इच्छा होती. त्यासाठी चांगले शिक्षण आवश्यक आहे, हे त्यांना माहीत होते. मात्र घरची परिस्थिती पाहून आई-वडिलांना सांगण्याचे धाडस त्यांना होत नव्हते. एके दिवशी त्यांच्या वडिलांनीच त्यांना जवळ बोलावले आणि प्रेमाने म्हणाले, की ' अब्दुल, आम्ही फारसे सुशिक्षित नाही; पण तुझ्यासाठी मोठी स्वप्ने पाहिली आहेत. आम्ही कष्ट करू, पैसे जमवू आणि तुला उत्तम शिक्षण देऊ.' वडिलांच्या या शब्दांनी अब्दुल यांचा आत्मविश्वास दुणावला. ते रामनाथपुरम येथे भावासोबत शिक्षणासाठी गेले आणि तेथे त्यांना एका चांगल्या शाळेत प्रवेश मिळाला. येथूनच त्यांच्या लहानपणीची संघर्षमय पण आशावादी

## वैज्ञानिकांचे बालपण



सुरूवात झाली.

शाळेमधील एका कठोर प्रसंगाने त्यांचे जीवनच बदलून गेले. कलाम घरापासून दूर असले, तरी शाळा खूप छान होती. उन्हाळ्यात पंख्यांची सोय नसल्यामुळे मुले झाडाखाली बसून अभ्यास करायची. एके दिवशी घाई-घाईत अब्दुल चुकीच्या तुकडीत गेले. तेथे गणिताचे शिक्षक रामकृष्ण अय्यर वर्ग घेत होते. त्यांनी अब्दुल यांना रागाने झापले आणि संपूर्ण वर्गासमोर शिक्षा केली. तुला तुझा वर्ग देखील शोधता येत नसेल, तर तू घरी गेले पाहिजे. त्यांनी त्यांना मारले व अपमानदेखील केला.

या घटनेने अब्दुल खूप खिन्न झाले. त्यांना आई-वडिलांचे कष्ट आठवले. परंतु रडत बसण्याऐवजी त्यांनी स्वतःशीच ठरवले, की ' मी माझ्या कुटुंबाचे नाव उज्ज्वल करीन. मी शाळेतील सर्वोत्तम विद्यार्थी बनेन.' त्या दिवसापासून त्यांनी दिवस-रात्र अभ्यास सुरू केला. काही महिन्यांतच त्यांनी गणितात पैकीच्या पैकी गुण मिळविले. दुसऱ्या दिवशी प्रार्थनेसाठी उभे राहून त्यांचे गणिताचे शिक्षक हसत म्हणाले, की ' मी ज्यांना शिक्षा करतो, ते विद्यार्थी नेहमीच घडतात. हा मुलगा अब्दुल शाळेचे नाव नक्की उज्ज्वल करणार." या शब्दांनी कलाम सर्व अपमान विसरून गेले. ते घरी गुणपत्रिका घेऊन गेले तेव्हा आईने गोडधोड केले आणि वडिलांनी गावात मिठाई वाटली. मेहनत आणि कष्टातून उभी राहिलेली महानता आपल्याला कलामांच्या निमित्ताने बघायला मिळते. घरची परिस्थिती गरीब असल्यामुळे लहानपणी कलाम वर्तमानपत्रे विकायचे. चिंचोक्या गोळा करून विकायचे. मेहनत करून शिक्षणाचा खर्च भागवायचे. त्यांना पायलट व्हायचे होते. त्यांच्या वडिलांची इच्छा ते कलेक्टर व्हावेत, अशी होती. मात्र नियतीला काही वेगळेच घडवायचे होते. ते पुढे रॉकेट इंजिनिअर बनले. भारताचे महान वैज्ञानिक झाले. नंतर देशाचे राष्ट्रपती झाले. त्यांनी भारताला गरुडझेप घेण्याचे स्वप्न दाखविले. त्यांचा प्रसिद्ध विचार आजही प्रत्येक तरुणाला प्रेरणा देतो. ' जर तुम्हाला सूर्यासारखे चमकायचे असेल, तर आधी सूर्यासारखे तापावे लागते. ' कलाम यांना भारतातील आणि जगातील ४० हून अधिक विद्यापीठांनी डॉक्टरेट देऊन सन्मानित केले आहे.

**डॉ. कलाम यांना मिळालेले प्रमुख मुख्य पुरस्कार**

**पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न, वीर सावरकर पुरस्कार, राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार, रामानुजन पुरस्कार.**

मुलांनो, डॉ. अब्दुल कलाम यांच्या बालपणीची ही संघर्षमय कथा आपल्याला एकच धडा देते- परिस्थिती कधीच अडथळा नसते. मेहनत, प्रामाणिकपणा आणि स्वप्नांवरील विश्वास यामुळे असंभवही शक्य होते. त्यांचे जीवन हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील प्रेरणादायी दीपस्तंभ आहे. त्यांच्या वाढदिवसाचा दिवस १५ ऑक्टोबर आपण जागतिक विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करतो.

**– मंगल नागरे-देशमुख**
**जि. प. शाळा, कलाली**
**(ता. अमळनेर, जि. जळगाव)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# भारत– पाकिस्तान सामन्याचा आज रंगणार थरार

## महामुकाबला


कर्णधार : आयुष म्हात्रे

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अंडर १९ आशिया कप २०२५ स्पर्धेतील पाचव्या सामन्यात टीम इंडिया विरुद्ध पाकिस्तान यांच्यात हायव्होल्टेज सामन्याचा थरार रंगणार आहे. दोन्ही संघांनी या स्पर्धेत विजयी सुरुवात केली आहे. त्यामुळे दोन्ही संघांना सलग दुसरा सामना जिंकण्याची समान संधी आहे. टीम इंडिया विरुद्ध पाकिस्तान या २ कट्टर आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी संघाच्या सामन्याची चाहत्यांना कायमच प्रतिक्षा असते. टीम इंडियाने गेल्या काही महिन्यांमध्ये सातत्याने विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानवर मात करून आपला दबदबा कायम ठेवला आहे. त्यानंतर आता पुन्हा एकदा हे २ कट्टर प्रतिस्पर्धी संघ पुन्हा एकदा आामनेसामने येण्यासाठी सज्ज झाले आहेत. टीम इंडिया आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ अंडर १९ वन डे आशिया कप २०२५ स्पर्धेत भिडणार आहेत. दोन्ही संघांचा हा या स्पर्धेतील दुसरा सामना असणार आहे. दोन्ही संघांनी या स्पर्धेत विजयी सुरुवात केली आहे. त्यामुळे सलग दुसऱ्या विजयासाठी दोन्ही संघात चुरस पाहायला मिळणार आहे.

टीम इंडिया पाकिस्तान यांच्यातील सामना हा रविवार, दि. १४ डिसेंबरला होणार आहे. या सामन्याला मोजून काही तासांचा अवधी बाकी आहे. या सामन्याचे आयोजन हे दुबई स्थिती आयसीसी अकादमी ग्राउंडमध्ये करण्यात आले आहे. सामन्याला भारतीय वेळेनुसार सकाळी १० वाजून ३० मिनिटांनी सुरुवात होणार आहे. त्याआधी १० वाजता टॉस होणार आहे.

**भारत–पाकिस्तानची विजयी सलामी**

अंडर १९ आशिया कप २०२५ स्पर्धेला १२ डिसेंबरपासून सुरुवात झाली. टीम इंडिया आणि पाकिस्तान या दोन्ही संघांनी या स्पर्धेत विजयी सुरुवात केली. टीम इंडियाने यूएई तर पाकिस्तानने मलेशियावर मात केली. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांनी आपला पहिला सामना हा २०० पेक्षा अधिक धावांच्या फरकाने जिंकला. भारताचा यूएईवर २३४ धावांनी विजय टीम इंडियाने यूएईवर २३४ धावांनी मात केली. वैभव सूर्यवंशी याच्या १७१ धावांच्या खेळीच्या जोरावर यूएई विरुद्ध ४३३ धावा केल्या. यूएईला प्रत्युत्तरात ५० ओव्हरमध्ये ७ विकेट्स गमावून १९९ धावांपर्यंतच पोहचता आले.

**पाकिस्तानकडून मलेशियाचा २९७ धावांनी धुव्वा**

तर दुसऱ्या बाजूला पाकिस्तानने टीम इंडियापेक्षा जास्त धावांच्या फरकाने आपला पहिला सामना जिंकला. पाकिस्तानने मलेशियाला २९७ धावांनी लोळवले. पाकिस्तानने मलेशिया विरुद्ध ३४५ धावा केल्या. त्यानंतर पाकिस्तानने मलेशियाला ४८ धावांवर गुंडाळले. ▲

**कोण जिंकणार?**

भारत आणि पाकिस्तान दोन्ही संघांनी पहिल्याच सामन्यात ३०० पेक्षा अधिक धावा केल्या. तसेच दोन्ही संघांच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली. त्यामुळे आता रविवारी १४ डिसेंबरला कोणता संघ सलग दुसरा सामना जिंकतो? याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागून आहे.


कर्णधार : फरहान युसूफ

# वेश्या व्यावसायिक महिलांमधील मातृत्वाचा गौरव

## एचआयव्ही, एड्स पंधरवडानिमित्त गांधलीपुरात मेळावा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : एचआयव्ही, एड्स दिनानिमित्त १ डिसेंबर ते १५ डिसेंबर सुरू असलेल्या पंधरवडानिमित्त येथील गांधलीपुरा भागात वेश्या व्यावसायिक महिलांसाठी मेळावा घेण्यात आला. ज्या वेश्या व्यावसायिक महिलांनी मुलांना उच्चशिक्षित करून आदर्श घडविला आहे, अशा मातांचा यावेळी सत्कार करून गौरव करण्यात आला.

पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, नायब तहसीलदार सी. यू. पाटील, ग्रामीण रुग्णालयातील एचआयव्ही समुपदेशक अश्वमेघ पाटील, ए. आर. टी. समुपदेशक जयेश मोरे, आधार संस्थेच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील, श्रीमती रेणूप्रसाद प्रमुख पाहुणे होते. यावेळी एचआयव्ही एड्सबाबत जनजागृती करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक गायकवाड यांनी कायदेविषयक सल्ला व आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. नायब तहसीलदार पाटील यांनी मुलांनी शालेय शिक्षणासोबत स्पर्धा परीक्षांची तयारी करावी. वेश्या व्यावसायिक महिलांना अत्यावश्यक असणारी शिधापत्रिका, रहिवासी दाखला व मतदान कार्ड मिळवून देण्याबाबत सहकार्याचे आश्वासन दिले. समुपदेशक अश्वमेघ पाटील यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. समुपदेशक दीपक शेलार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ देवेंद्र मोरे आदी उपस्थित होते. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. अश्विनी सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती रेणू प्रसाद यांनी आभार मानले. राकेश महाजन, तौसिफ शेख, यास्मिन शेख, वंदना पावरा, आनंद पगारे, सीमा शेख, संध्या नागरे आदींनी सहकार्य केले.

दरम्यान, सकाळच्या सत्रात महिलांसाठी आरोग्य तपासणीसाठी शिबिर घेण्यात आले. मुलांना प्रोटीन किटचे वाटप करण्यात आले. ▲

## निधन वार्ता



### प्रभाकर देशमुख

अमळनेर : येथील पटवारी कॉलनी परिसरातील रहिवासी तथा मराठा समाजाचे माजी उपाध्यक्ष प्रभाकर दिनकरराव देशमुख (वय ९१) यांचे शनिवार, दि. १३ डिसेंबर रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना व नातवंडे असा परिवार आहे. जितेंद्र देशमुख व राजेंद्र देशमुख यांचे ते वडील होत. प्रभाकर देशमुख यांनी समाजासाठी मोठे योगदान दिले आहे. दानशूर म्हणून ते परिचित होते. ▲

# बिऱ्हाडेंनी अमलात आणली डिजिटल मिशन संकल्पना

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिजिटल भारत या संकल्पनेशी सुसंगत डिजिटल मिशन ही संकल्पना येथील रहिवासी व ग्रोहोचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक सचिन बिऱ्हाडे यांनी अमलात आणली आहे. प्रत्येक नागरिकाची सर्व माहिती, सर्व योजना, लाभ एकाच लिंकवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पारदर्शी कारभारास पुष्टी मिळणार आहे.

या प्रकल्पातून शासनाला महसूल प्राप्त होणार आहे. आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, जनगणना विभाग, ग्रामसेवक, आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, जिल्हाधिकारी, सीईओ याना थेट लाभ होणार आहे. यात गावपातळीवरील मिळकत डिजीटायझेशन, क्यू आर कोड सह उताऱ्याचे पुनरावलोकन, घर क्रमांक निर्धारण, जनगणना व हेल्थ रेकॉर्ड व्यवस्थापन हे एकाच प्लॅट फॉर्मवर उपलब्ध होणार आहे.

**अमळनेरचे युवक अव्वल**

या अभिनव प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रोहो कडे १५०+ आयटी तज्ञांची अत्यंत कुशल टीम कार्यरत आहे. जी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने देशाला डिजिटलदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी सज्ज आहे. राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी ग्रोहोच्या संकल्पनेचे कौतुक केले आहे. राज्यातील डिजिटल सक्षमीकरणासाठी हा अत्यंत उपयुक्त आणि आधुनिक तंत्रज्ञानाधारित प्रकल्प ठरेल, असे त्यांनी प्रतिपादन केले. ▲

# चारशे चाळीस वर्षे जुन्या सोन्याच्या नाण्याने तोडले सर्व रेकॉर्ड

## लिलावात मिळाले इतके रुपये ?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



चारशे चाळीस वर्षांपूर्वीच्या काळातील एका सोन्याच्या नाण्याचा लिलाव झाला आहे. हे नाणे इतके दुर्मिळ आहे, की जगात अशी मोजकीच नाणी उरली आहेत.

लंडन इतिहासातील एका सोन्याच्या नाण्याला लिलावात कोट्यवधी रुपये मिळाले आहेत. ब्रिटनच्या सर्वात प्रसिद्ध शासकांपैकी एक असलेल्या महाराणी एलिझाबेथ प्रथम (१५५८– १६०३) यांच्या शासनकाळात आलेल्या एका नाण्याचा लिलाव रेकॉर्डब्रेक किंमतीत झाला आहे. यास अधिकृतपणे 'एलिझाबेथ प्रथम गोल्ड शिप रायल' म्हटले जाते. हे नाणे केवळ सोन्याचा तुकडा नाही, तर यामागे एक रोमांचक इतिहास लपला आहे. हे नाणे १५८४ ते १५८६ दरम्यानचे आहे.

हेरिटेज ऑक्शनद्वारा नोव्हेंबरमध्ये आयोजित लिलावात हे नाणे ३, ७१, ००० डॉलर (सुमारे ३. ३० कोटी रुपयांना विकले गेले आहे.

ही एलिझाबेथ शिप रायल नाण्याची आतापर्यंत सर्वात मोठी बोली म्हटली जात आहे. इतिहास तज्ज्ञांच्या मते या नाण्यांना तयार करण्यासाठी जे सोने वापरण्यात आले होते, ते सर फ्रान्सिस ड्रेक यांनी स्पॅनिश जहाजातून लुटले होते. ड्रेक यांना इंग्रज एक हिरो आणि प्रायवेटियर मानत होते. तर स्पॅनिश त्यांना समुद्री चाचा म्हणायचे. त्यावेळी खूपच कमी 'शिप रायल' नाणी तयार करायची. इतिहासकारांनी सांगितले, की ही नाणी अमेरिकन वसाहतीकरणाची सुरुवात आणि १५८८ मध्ये स्पॅनिश अर्माडाच्या पराभवाच्या आधी समुद्रावरील इंग्लंडच्या दबदब्याला दर्शवते.

**नाण्यांवरील डिझाईनचा संदेश काय ?**

या नाण्याचे सौदर्य पाहातच रहावे असे आहे. याच्या समोरच्या भागावर (ऑबझर्व) महाराणी एलिझाबेथ प्रथम यांना एका जहाजावर उभे असल्याचे दाखवले आहे. त्यांनी गाऊन परिधान केला असून त्यांच्या हातात राजदंड आणि ओर्बआहे. ही मुद्रा समुद्रावर त्यांच्या शक्तीचे प्रतिक आहे.

नाण्याच्या पाठच्या भागावर फुलांची डिझाईनसह एक क्रॉस बनविले आहे. याला चमकत्या सूर्यावर गुलाब आणि मुकूट घातलेले सिंह दिसत आहेत. यात चारही बाजूंनी लॅटीन भाषेत एक बायबल संदेश लिहिलेला आहे. त्याचा अर्थ, 'परंतू येशू त्यांच्यातून चालत, आपल्या रस्त्याने निघून गेले' हा ल्यूक ४: ३० चा संदर्भ आहे. त्या वेळी अनेक ट्युडर नाण्यांवर लिहिलेला असायचा.

**काय आहे रायल ?**

'रायल' हा मूळ रुपातील स्कॉटलँडचे एक सोन्याचे नाणे होते. एक रायल सर्वसाधारणपणे ६० शिलिंगच्या बरोबरचा आहे. नाण्यांच्या इतिहासातील एक सर्वात प्रसिद्ध 'रोज रायल' आहे. जो एलिझाबेथ यांच्या नंतर राजा जेम्स प्रथम यांच्या शासनकाळात आला होता. आजच्या काळात रियाल इराण, ओमान आणि यमन सारख्या देशांच्या नाण्यांमध्ये मानक एकक आहे. मात्र, ब्रिटनमध्ये हे चलन नाही. हेरिटेज ऑक्शनचे मॅनेजिंग डायरेक्टर काईल जॉनसन यांनी सांगितले, की हा एक अविश्वसनीय कलेक्शनचा हिस्सा आहे. ४०० वर्षांहून अधिक जुने असूनही हे नाणे 'मिंट स्टेट' (एमएस६३) कंडीशनमध्ये आहे.ज्यामुळे हे खूपच खास नाणे आहे. ब्रिटिश नाणेशास्त्र संग्राहक यांच्या दरम्यान सर्वात जास्त मागणी असणाऱ्या नाण्यांपैकी हे एक आहे. हे मध्ययुगीन डिझाईन शैलीत तयार केल्या शेवटच्या नाण्यांपैकी एक असून जगात आज अशी खूपच कमी नाणी उरली आहेत. त्यामुळेच याला कोट्यवधीचा भाव मिळाला आहे. ▲

# नियोजित वधू–वरांची अतिउत्साही समाजकार्यकर्त्यांच्या तावडीतून सुटका!

## धनंजय सोनार: सर्वांना एकाच मापात तोलू नका

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : जोडपे दिसले रे दिसले की लफडे समजून तुटून पडायची वृत्ती फोफावत आहे. काही अतिउत्साही कार्यकर्ते बेकायदा पोलिसिंग करीत असल्याचा प्रकार वाढत आहे. असाच एक प्रकार सामाजिक कार्यकर्ते धनंजय सोनार यांनी शनिवार, दि. १३ रोजी हाणून पाडत एका जोडप्याची सुटका केली.

शहरातील एका उपहारगृहातून अल्पोपहार करून धुळे येथील तरुण व तरूणी बाईकवर मनुदेवी जायला निघाले होते. लफडे आहे असे समजून येथील काही तरुणांनी त्यांचा पाठलाग केला. देवळी रस्त्यावर अडवत त्यांचा मोबाईल हिसकावून घेतला. तुमच्या आईवडिलांना बोलवा असे त्यांना तरूणांनी सांगितले. यावेळी त्या जोडप्याने, आमचे लग्न ठरले आहे व मनुदेवी दर्शनाला जात असल्याचे सांगितले. तरूणांच्या विनवण्या केल्या. मात्र, मंडळी पोलीस असल्याच्या थाटात त्यांची विचारपूस करीत होते. प्रकरण हाताबाहेर जात असताना सामाजिक कार्यकर्ते धनंजय सोनार यांनी वाहन थांबवून हस्तक्षेप केला. दोघांच्या कुटुंबाशी बोलणे झाले. त्यांचा विवाह ठरला असून, घरच्यांच्या परवानगीनेच देवदर्शनाला जात असल्याने श्री. सोनार यांनी अतिउत्साही कार्यकर्त्यांची कानउघाडणी केली. पोलिसांना पाचारण करण्याचे सांगताच या स्वयंघोषित समाजसेवकांनी पळ काढला. तरुण– तरुणी मनुदेवीला रवाना झाले. लव्ह जिहाद, लफडे, प्रेमविवाहास विरोध म्हणून तुटून पडण्याची वृत्ती बळावत असून अशी बेकायदा पोलिसिंग थांबली पाहिजे. यातून गैर प्रकार देखिल घडू शकतात म्हणून सर्वांना एकाच नजरेने पाहू नये, असे आवाहन धनंजय सोनार यांनी केले आहे. ▲

# ' मनरेगा 'तून महात्मा गांधींचे नाव गायब!

## आता ' हे ' असणार नवे नाव; केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी


ग्लोबल महातेज वृत्तसेवा




अमळनेर : मोदी सरकारचा भारतातील विविध शहरांची मुस्लिम नावे, विविध सरकारी विभागांची तसेच संस्थांची नावे बदलण्याचा कार्यक्रम सुरू असतानाच आता ग्रामीण भागातील जनतेशी संबंधित एका महत्त्वाच्या योजनेचे नाव बदलण्याला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

ही योजना म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गॅरंटी अधिनियम अर्थात ' मनरेगा ' या योजनेचे नाव बदलण्यात येणार आहे. यासाठी नवे नाव देखील सरकारने निश्चित केले आहे. त्यामुळे लवकरच ' मनरेगा ' योजना आता नव्या नावाने ओळखली जाणार आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू असतानाच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारने २००५ मध्ये आणलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अधिनियम या कायद्याचे नाव बदलले आहे. याचे नाव आता ' पूज्य बापू ग्रामीण रोजगार गॅरंटी योजना ' असे असणार आहे. नाव बदलण्याबरोबरच या योजनेत काही महत्त्वाचे बदलही सरकारने केले आहेत. त्यानुसार सरकारने रोजगार हमी देणारे दिवस वाढविले असून, ते १२४ दिवस करण्यात आले आहेत. तसेच मानधनातही वाढ करण्यात आली असून, ते आता २४० रुपये दिवसाला इतके असणार आहे.

दरम्यान, सुरूवातीला जेव्हा यूपीए सरकारने ही योजना आणली तेव्हा तिचे नाव राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ (नरेगा) असे होते. पण नंतर यामध्ये बदल करून ते महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा अधिनियम (मनरेगा) असा करण्यात आला. हा एक कामगार कायदा असून, त्याचा उद्देश भारताच्या ' रोजगाराचा हक्क ' या तत्त्वाखाली ' सामाजिक सुरक्षा ' प्रदान करणे हा आहे. या योजनेचा प्राथमिक हेतू हा ग्रामीण भागातील अकुशल कामगारांच्या रोजगाराची हमी देणे हा आहे. या कायद्यानुसार ज्या व्यक्तींना काम करायचे आहे त्यांना ग्रामीण भागात कुठल्याही स्वरूपातील कामासाठी १०० दिवस कामाची हमी दिली जाते. कुठल्याही घरातील व्यक्ती या योजनेचा लाभ घेऊ शकतात. ▲



### बागडे यांना पॅरा पॉवरलिफ्टिंग राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील दिनेश बागडे यांनी पुणे येथे झालेल्या चौथ्या राज्यस्तरीय पॅरा पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत १०५ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले आहे. दिनेश बागडे यांची १६ ते १८ जानेवारी २०२६ रोजी उत्तराखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॅरा पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दिनेश यांनी यापूर्वी खेलो इंडियाच्या पॅरा पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले असून २०२४ मध्ये झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेतही कांस्यपदक मिळवले होत. त्यांच्या या यशाबद्दल अमळनेर येथील क्रीडा प्रेमींनी अभिनंदन केले आहे. ▲




॥ मंगल पान ॥

# एक प्रेरणादायी अध्यात्मवंत : संत गोंदवलेकर महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी संतपरंपरेतील तेजस्वी आणि करुणामय अध्यात्मवंत म्हणजे श्री संत ब्रह्मचारी गोंदवलेकर महाराज. ‘ राम-राम ’ या अखंड नामसंकीर्तनाला जीवनाचे सर्वोच्च साधन मानणाऱ्या या महात्म्यांनी महाराष्ट्रात भक्ती चळवळीला नवसंजीवनी दिली. आज १४ डिसेंबर अर्थात त्यांची पुण्यतिथी. त्यानिमित्त...



### जीवनचरित्राची झळाळी

गोंदवलेकर महाराजांचा जन्म सातारा जिल्ह्यातील गोंदवले येथे झाला. बालपणापासूनच अध्यात्माची ओढ, साधेपणा आणि करुणा यांचा प्रकर्ष होता. सांसारिक व्यवहारात अलिप्त राहूनही लोककल्याणाचा ध्यास त्यांनी घेतला. वैदिक अध्ययन, धर्मग्रंथांचे चिंतन आणि सततच्या जप-साधनेने त्यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण घडले.

### ‘ रामनाम ’ साधनेचा प्राण

महाराजांचे संपूर्ण जीवन ‘ रामनाम ’ या एका महामंत्राभोवती फिरत होते. त्यांच्या मते, रामनाम हे सर्व साधनांचा सार. रामनाम म्हणजे मनःशांतीची गुरुकिल्ली. रामनामानेच संसारातील दुःखांचा नाश होतो. म्हणूनच त्यांनी भक्तांना नेहमी सांगितले, की ‘ नामस्मरण करा, बाकी सर्व रामभरोसे सोपवा.’ त्यांच्या आश्रमात दिवस-रात्र अखंड रामनामाचा गजर असायचा. ही निष्ठा पाहून अनेकांना आध्यात्मिक शांतीचा मार्ग सापडला.

### पुण्यतिथीचे महत्त्व

गोंदवलेकर महाराजांची पुण्यतिथी म्हणजे स्मरण, साधना आणि सेवा यांचा पवित्र संगम. या दिवशी रामनाम संकीर्तन, सामूहिक जप, अन्नदान, सत्संग यांचे आयोजन केले जाते. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन प्रत्येक भक्ताने किमान एक सत्कृत्य करण्याची संधी शोधावी, हीच खरी श्रद्धांजली. दै. ‘ ग्लोबल महातेज ’ परिवारातर्फे त्यांना विनम्रतापूर्ण अभिवादन!

### सद्वर्तनाचा संदेश

गोंदवलेकर महाराजांचे उपदेश अत्यंत सरळ, साधे पण जीवन बदलविणारे होते. त्यांच्या शिकवणीत काही मोलाचे मुद्दे होते. सदाचार आणि सत्यनिष्ठा व्यक्तीचा चरित्रबल हेच सर्वांत मोठे धन आहे. स्वावलंबन जीवनातील कर्तव्ये टाळू नयेत. हाताचे काम आणि रामाचे नाम हेच जीवनाचे नियम. सेवाभाव समाजातील दुर्बल, गरजू यांची सेवा म्हणजेच श्रेष्ठ पूजा. उपदेशापेक्षा आचरण, त्यांनी केलेली जीवनपद्धतीच त्यांच्या उपदेशाची खरी साक्ष होती.

### लोककल्याणाची अतूट परंपरा

गोंदवलेतील त्यांच्या आश्रमातून असंख्य सेवाकार्ये, अन्नदान, धार्मिक-वाङ्मयप्रसार, रामनाम सप्ताह, सत्संग आयोजित केले जात. त्यांचा आश्रम आजही सामाजिक एकात्मता, निःस्वार्थ सेवा आणि भक्तिभाव या तिन्ही गोष्टींचा पवित्र संगम जपतो.

### महाराजांचे आध्यात्मिक योगदान

गोंदवलेकर महाराजांचे अध्यात्म केवळ विधी-पूजांपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी देव-भक्त भावनांचा सेतू बांधत अद्वैतातील भक्तिमार्ग सहजतेने उलगडून दाखविला. त्यांचे योगदान तीन पातळ्यांवर उल्लेखनीय आहे.

१) आंतरिक शांतीचा सिद्ध मार्ग : निर्गुण-सगुणाच्या भेदापलीकडे जाऊन नामामध्ये परमेश्वराचा साक्षात्कार.

२) समाजमनाचे शुद्धीकरण : साधना, सेवा आणि सद्वर्तन यामुळे समाजातील कलुषत्व दूर करण्याचे कार्य.

३) भक्ती-वाङ्मयाचा प्रसार : त्यांच्या जीवनातून आणि उपदेशातून रामभक्तीचे महात्म्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचले.

## मना सज्जना...

# ‘ मन वढाय वढाय... ’



सद्गुरू समर्थांचे स्मरण करून पुढे जाऊया. मागील भागात आपण सदाचाराचे महत्त्व पाहिले. पुढील श्लोक हा मनाला आवाहन करणारा आणि मनाचे वर्तन कसे असावे यासंबंधी मार्गदर्शन करणारा आहे. खानदेश कन्या बहिणाबाई चौधरी त्यांच्या ‘ मन वढाय वढाय ’ या कवितेत म्हणतात,

**मन वढाय वढाय,**
**उभ्या पिकातल ढोर,**
**किती हाकला हाकला,**
**फिरी येत पिकावर...**

मनाची इतकी चपखल व्याख्या अन्य कुठल्या कवितेत दिसून येत नाही. मनाला जितका आवर घालावा तितके ते स्वैर होत जाते. अशा अचपळ मनाला आवर घालायला संतांची शिकवणच परिणामकारक ठरते.
सद्गुरू समर्थ मनाचे प्रबोधन करताना म्हणतात,

### श्लोक ४

**मना वासना दुष्ट कामा नये रे ।**
**मना सर्वथा पाप बुद्धी नको रे ।**
**मना सर्वथा नीती सोडू नको हो।**
**मना अंतरीचा सार विचार राहो ॥ ४ ॥**

मानवी मन हेच खरे रणांगण असते. बाह्यशत्रूंपेक्षा अंतःकरणातील विकार अधिक भयंकर असतात. त्यांच्याशी सतत लढावे लागते. हे द्वंद्व मनाला थकवून टाकते. समर्थ मनाला अत्यंत स्नेहाने हाक देतात.
या श्लोकातील प्रत्येक ओळ म्हणजे जीवनपथावर योग्य दिशा दाखविणारा दीपस्तंभ जणू.
**‘ मना वासना दुष्ट कामा नये रे’** येथे ‘ वासना ’ म्हणजे केवळ कामवासना नव्हे, तर लोभ, मत्सर, क्रोध, अहंकार, मद, उन्माद यांचा देखील यात समावेश होतो. या षड्रिपुंपासून मनाने दूर राहावे. कारण वासना मनाचा ताबा घेतात तेव्हा विवेकाचा दिवा क्षीण होतो. माणसाचा मार्ग चुकतो.
**‘ मना सर्वथा पाप बुद्धी नको रे ’**

मनातील संकल्प हे सदैव शुद्ध राहोत. भाव सदैव शुद्ध राहोत. बुद्धी जर चुकीच्या दिशेला वळली तर माणूस चुकीचे निर्णय घेतो, चुकीची कृत्ये करतो. पुढे त्याचे विपरीत परिणाम त्याला भोगावे लागतात. ‘ पाप करावे असे सुचविणारी वाम बुद्धी कदापि नको.’ कारण मन वाममार्गाला झुकले, की शब्द, कृती, वर्तन सगळेच दुःखदायक, क्लेशदायी होते.
**‘ मना सर्वथा नीती सोडू नको हो ’**

नीती म्हणजे आपले संस्कार, धर्म, कर्तव्य, सत्य, प्रामाणिकता, कृतज्ञता हे गुण सोडले की माणूस कितीही मोठा असला, तरी तो खोटा ठरतो. रोजच्या जगण्यात अनेक लोभाचे प्रसंग माणसाच्या आयुष्यात येतात घडतात. वेळोवेळी संस्कारांचा कस लागतो. अशावेळी व्यवहार कठीण असला, तरी नीतीने वागणे सोडू नये. अडचणीच्या वेळीच नीतीची खरी कसोटी असते.
**‘ मना अंतरीचा सार विचार राहो ’**

ही ओळ म्हणजे संपूर्ण श्लोकाचा आत्मा जणू. सारासार विचार करणारा मनुष्य प्रत्येक घटनेकडे सजग होऊन पाहत असतो. आपल्या कृतीचे बरे-वाईट परिणाम लक्षात घेऊन आपले वागणे बोलणे ठेवले, की मग माणसाच्या पदरी निराशा उद्वेग येत नाही. सारासार विचार म्हणजे मनुष्य जन्माची सार्थकता कशात आहे, हे समजून कृती करणे. आपण कोण आहोत? आपली भूमिका काय आहे? आपल्या एखाद्या कृतीमुळे कुणाचे नुकसान होणार तर नाही ना? मनात हा सारभूत विचार टिकला, की विकार, पापबुद्धी, वासना हे अवगुण आपोआप दूर होतात. मन शांत, स्थिर, पवित्र होते. समर्थांची ही शिकवण म्हणजे मनाचे संस्कार करण्याचे सिद्ध वचन. वासनांचे दमन, पापबुद्धीचा त्याग, नीतीवरची निष्ठा आणि अंतरी विवेकाचा दीप कायम तेवत ठेवणे, हाच भक्तिपंथाचा पाया असतो.
समर्थांनी दासबोधाच्या ११ व्या दशकातील ४ समासांत ‘ सार विवेक निरूपण नाम,’ समास आहे. यात सारासार विवेक पाळण्याबद्दल मार्गदर्शन केले आहे. ते म्हणतात,

**म्हणूनी हा विचार करावा ।**
**सत्य मार्ग तो जी धरावा ।**
**लाभ जाणून घ्यावा । विवेकाचा ॥**
**सारागार एकच सरी ।**
**तेथे परीक्षेस कैची उरी ।**
**या कारणे चतुरी ।**
**परीक्षा करावी ॥**

आपण मनाचे श्लोक रोज वाचतो. त्यावर चिंतन, मनन करावे. एखाद्या श्लोकापाशी असे थोडे थांबावे. स्वतःला प्रश्न विचारावा, की यातील काही सार आपल्या जीवनात उतरते का?

**जय जय रघुवीर समर्थ!**

**– भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. : 94203 89541**

# सूर्याचे ७ शक्तिशाली मंत्र जपल्याने सर्व इच्छा पूर्णत्वास येतात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



ग्रहांचा राजा मानला जाणारा सूर्य हा हिंदू धर्मातील पाच देवांपैकी एक मानला जातो. ते जीवनातील आदर आणि यशाचे घटक देखील मानले गेले आहेत.

आठवड्यातील प्रत्येक दिवस कोणत्या ना कोणत्या देवाला समर्पित असतो. तसेच रविवारी सूर्यदेवाची पूजा केली जाते. असे मानले जाते की रविवारी सूर्यदेवाला समर्पित काही विशेष मंत्रांचा जप केल्यास व्यक्तीच्या जीवनातील सर्व मनोकामना पूर्ण होतात. आज तुम्हाला अशाच काही मंत्रांबद्दल सांगणार आहोत. या ७ शक्तिशाली मंत्रांपैकी ज्याचा उच्चार तुम्ही अचूकपणे करू शकता आणि बरोबर लक्षात ठेवू शकता त्यापैकी एकाचा रविवारी जप करावा.

सूर्यदेव तुमच्या सर्व मनोकामना निश्चितपणे पूर्ण करतील.

### रविवारी करा हा उपाय (रविवार उपाय)

रविवारी भगव्या रंगाचे कपडे घालावेत. शक्य असल्यास रविवारी उपवास ठेवा आणि सूर्यदेवाची पूजा करा. सूर्यदेवाची कृपा होण्यासाठी रविवारी गूळ, लाल फुले, तांबे, गहू इत्यादींचे दान करावे. माणिक रत्नाने सूर्य मजबूत होतो. त्यामुळे कुंडलीत कमकुवत रवी असलेल्या लोकांनी रुबी धारण करावे. रविवारी बेल मूळ धारण करून एकमुखी रुद्राक्ष धारण करावा. यामुळे जीवनात आनंद आणि लाभ मिळतो.

**सूर्यदेव मंत्र**
**ॐ घृणिं सूर्य्यः आदित्यः**
**ॐ ह्रीं ह्रीं सूर्याय सहस्रकिरणराय मनोवांछित फलम् देहि देहि स्वाहा.**
**ॐ ऐहि सूर्य सहस्त्रांशों तेजो राशे जगत्पते, अनुकंपयेमां भया, गृहाणार्घ्य दिवाकर :**
**ॐ ह्रीं घृणिः सूर्य आदित्यः क्लीं ॐ**
**ॐ ह्रीं ह्रीं सूर्याय नमः**
**ॐ सूर्याय नमः**
**ॐ घृणि सूर्याय नमः**

धार्मिक शास्त्रांमध्ये सूर्याला प्रभावशाली ग्रह मानले गेले आहे. म्हणूनच सूर्याला ग्रहांचा राजा असेही म्हणतात. सूर्य हा ऊर्जा आणि आत्मा यांचा कारक आहे.

असे म्हटले जाते, की जर कुंडलीत सूर्य मजबूत स्थितीत असेल आणि शुभ ग्रहांच्या प्रभावाखाली असेल तर अशी व्यक्ती राजासारखी असते. सूर्याभिमुख व्यक्ती जीवनात उच्च स्थान प्राप्त करून मान-सन्मान प्राप्त करतो, असे म्हणतात.

# कुठल्याही रविवारी या गोष्टी लक्षात ठेवा

## संपूर्ण आठवडा आनंदी राहाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या कुंडलीत सूर्य दुर्बळ पडू नये आणि आपल्याला अनिष्ट काळ पाहवा लागू नये, यासाठी रविवारी अर्थातच सूर्यवारी काही कामे अशी आहेत ती करणे टाळावे. जेणेकरून आपला संपूर्ण आठवडा आनंदात पार पडू शकतो. आपल्या शास्त्रात बऱ्याच अशा गोष्टी आहेत ज्या अशुभ मानल्या जातात. त्यामुळे रविवारी कोणती अशी कामे आहेत की जी मुळीच करू नये.

- रविवारी सूर्यास्तापूर्वी मीठ वापरू नये. अर्थात मिठाचा उपयोग टाळावा. हे अशुभ मानले जाते.
- रविवारी तामसिक खाद्यपदार्थ तसेच मास-मदिरा यापासून लांबच राहावे. हे सेवन केल्याने सूर्याचा दुष्प्रभाव जागृत होत असतो. रविवारी गरज नसल्यास बूट घालू नयेत.
- रविवारी मोहरीच्या तेलाने डोक्याची मालीश करू नये.
- या दिवशी दूध तापवताना ऊतू जाऊ देऊ नये. रविवारी पिंपळाची पूजा करू नये तसेच पिंपळाच्या झाडाला जल अर्पित करू नये. या दिवशी त्यात दारिद्र्याचा वास असल्याचे मानले गेले आहे.
- रविवारी तुळस तोडू नये तसेच तुळशीच्या झाडाला पाणी घालू नये.
- या दिवशी तांब्याची कोणतीही वस्तू खरेदी करू नये. तसेच विकू देखील नये. शक्यतोवर तांबेनिर्मित वस्तू वापरू नये.
- रविवारी निळा, काळा, ग्रे रंग परिधान करणे टाळावे.

आता हे जाणून घेऊ की काय करू नये किंवा जाळू नये.

- रविवारी सूर्य आणि भैरवनाथ पूजनाचे विशेष महत्त्व आहे.
- या दिवशी सकाळी अंघोळ करून सूर्याला मंत्रोच्चारण करत अर्घ्य द्यावे.
- या दिवशी सूर्य मंत्र आणि भैरव मंत्र जपावेत.
- या दिवशी तांबे खरेदी किंवा विक्री करू नये. परंतु तांबे, गूळ, लाल चंदन, सूर्य महिमा दर्शविणाऱ्यांना पुस्तक दान करावे. याने सर्व अडचणी दूर होतात आणि यश प्राप्ती होते.

# श्रीदत्तराज गुरुमाऊली

## भगवंताजवळ वास ठेवल्यावर वासना राहतच नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



एखादा मनुष्य दुष्ट निघाला, तर मागील जन्मी तो कसाब असेल, असे आपण म्हणतो. मात्र, हे बरोबर नाही. मनुष्याला वासनेनेच जन्म येतो, कर्माने नाही. म्हणूनच कर्म टाळायचे नसते. त्याच्यामागची वासना टाळावी लागते. कर्म हे केव्हाही बाधक ठरत नाही, तर कर्माचा हेतू बाधक ठरतो. अधिकाऱ्यापुढे शिपाई चालतो आणि कैद्याच्या पुढेही चालतो. मात्र यामध्ये जो फरक आहे, तोच संतांच्या आणि आपल्या वासनेत आहे. आम्ही वासनेचे खत विषयाला घालतो आणि विषयांतच गुंतून राहतो. वासनेचा क्षय सत्संगाशिवाय नाही होणार, संगतीने मनावर परिणाम घडतो. वासना ही दुसऱ्या कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ वास ठेवला तरच ती नष्ट होते. वासना म्हणजे विषयाजवळचा वास ना-म्हणजे नको. सकाळपासून सायंकाळपर्यंत आणि रात्रीपर्यंत वासनेमुळे सर्व कर्म एकमेकांत गुंतून गेली आहेत. म्हातारे आणि तरुण या सर्वांना वासना सारखीच आहे. मी आता कंटाळलो असे म्हटले, तरी वासना आपल्याला सोडत नाही. देह ठेवतानाही आपली वासना आपल्याबरोबर येते. परमात्मा जसा चिरंजीव आहे, तशी वासना पण चिरंजीव आहे.

वासनेच्या किंवा हवेपणाच्या तीन अवस्था आहेत. एक आस, दुसरी हव्यास आणि तिसरी ध्यास. आस म्हणजे वस्तू नुसती हवीशी वाटणे. हव्यासामध्ये वस्तू नेहमीच आपल्याजवळ असावीशी वाटते आणि ध्यासामध्ये त्या वस्तूशिवाय इतर काहीच सुचत नाही. मोठे झाड तोडायचे असेल तर आपण त्याच्या वरच्या फांद्या आधी तोडतो, नंतर बुंधा तोडतो. त्याचप्रमाणे वासनेचे झाड तोडण्यासाठी त्याच्या फांद्या म्हणजे आपले हवे- नको-पण- आधी तोडाव्या, आणि शेवटी वासना मारावी. आपल्याला जे मागायचे आहे ते भगवंताजवळच मागावे. त्याने ते नाही दिले, तर ते न देणेच आपल्या हिताचे आहे अशी बुद्धी उत्पन्न होईल. त्यानेच वासना मरेल आणि वासना नष्ट झाल्यावर बुद्धी भगवत्स्वरूप होईल. काहीही न करता मिळावा इतका का परमार्थ सोपा आहे ? त्याच्यासाठी निदान वाईट वासना तरी मारायला नको का? आणि चांगल्या वासनासुद्धा नीती आणि धर्माला धरून असतील तेवढ्याच भोगाव्या. श्रीमंतांच्या गरजा मरेपर्यंत भागत नाहीत, कारण त्यांना वासना जास्त असते. काळ हा आपल्याला आशेत गुंतवून ठेवतो आणि शेवटपर्यंत सुख न देता आपले आयुष्य संपवितो. जो जीवंतपणी वासनारहित राहिला त्याला सुख-दुःख नाही. आपण आपल्याच घरामध्ये पाहुण्यासारखे वागावे. असे राहण्याने वासना क्षीण होईल.
‘राम कर्ता’ ही भावना ठेवून नामात राहण्याचा प्रयत्न करा, म्हणजे वासनेची नांगी मोडलीच म्हणून समजा.
**(वरील माहिती विविध धर्मग्रंथातून संकलित केली आहे.)**

## देवं चैवात्र पंचमम्

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**“अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् । विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥”**

कुठलेही कार्य यशस्वी होण्यासाठी पाच गोष्टी आवश्यक असतात. एक म्हणजे अधिष्ठान (स्थान किंवा शरीर), दुसरा कर्ता (कर्म करणारी व्यक्ती), तिसरा करण (साधने, साधने किंवा उपकरणे), चौथा विविध प्रकारचे प्रयत्न किंवा क्रिया, आणि पाचवा व अंतिम म्हणजे दैव (दैवी इच्छा किंवा प्रारब्ध). श्री मदभगवदगीतेच्या या श्लोकात श्रीकृष्ण सांगतात, की कोणतेही काम केवळ माणसाच्या प्रयत्नांवर अवलंबून नसते. त्यामध्ये इतरही अनेक घटक कार्यरत असतात. या सर्वांत शेवटचा घटक म्हणजे दैव, ज्यावर मानवाची सत्ता नसते. म्हणूनच आपण आपल्या कृतीचे परिणाम पूर्णपणे नियंत्रित करू शकत नाही. त्यात काहीतरी अदृश्य शक्ती (दैव) कार्यरत असते. हा श्लोक आपल्याला विनम्रतेचा, संयमाचा आणि कर्तृत्वाच्या मर्यादांचा विचार करण्यास प्रवृत्त करतो.

# एकादशी का करावी ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



एका ग्रुपवर एकादशीवर एकाने प्रश्न विचारला, की एकादशी का करावी? त्याचे उत्तर मी दिले. ती कॉपी पेस्ट येथे करतो आहे.

आपल्या शरीरात एक जंक (डीएनए) वैज्ञानिकांना आढळून आला. त्याचा आकार आपल्या बुटाच्या लेससारखा असतो. तो दोन्ही बाजूंनी निमुळता होत गेलेला आणि दोन्ही टोके घट्ट. त्याचे नेमके काय काम आहे, हे मात्र कळत नव्हते. पण त्यावर संशोधन केले गेले. त्यातून असे कळाले, की जेवढे शरीरात प्रोटिन्स जास्त जातील तेवढी त्याची झीज होते आणि तो आकुंचित होत जातो. ज्या दिवशी त्याचा पूर्ण ऱ्हास होतो त्या दिवशी शरीर काम करणे बंद होते.

आता शरीर म्हटले, की प्रोटीन्स तर आवश्यकच आहेत. पण ते शरीरात कमी प्रमाणात गेले तरी प्रॉब्लेम म्हणून त्याला काही विशिष्ट कालावधीत खंड पाडायचा म्हणून शाकाहारी लोकांनी १५ दिवसांतून एक प्रोटीन्स घेणे बंद करावे. मांसाहारी लोकांनी ३० दिवस बंद केले, तर त्या जंकची खंडन प्रक्रिया खंडित होते. आयुर्मान वाढते, असे सिद्ध झाले आहे.

### आता एकादशीच का ?

मानवी जीवनावरच नव्हे, तर पूर्ण पृथ्वीवर चंद्राच्या तिथीचा परिमाण होतो, हे सर्वांना माहिती आहे. एकादशीला तहान कमी लागते. इतर दिवसांच्या मानाने हे तुम्हीही बारकाईने निरीक्षण केल्यावर तुम्ही पण समजू शकाल. शरीरातील पाण्याची मात्रा कमी होते. पण दुसऱ्या दिवशी ही मात्रा पूर्ववत व्हावी म्हणून एकादशीचा उपवास सोडताना भात खाणे अनिवार्य मानले गेले आहे. भात किंवा साखर खाली की तहान जास्त लागते. उपवासाला प्रोटीन्स जास्त खाऊ नयेत, अस मानले जाते.
म्हणून एकादशीचा उपवास करावा.